**नि.दि.दा.क्र. ३३५/२०११**

विठ्ठल लबडे व इतर वि. राजाराम व इतर

**नि.क्र.१२३ लगत**

**वादींतर्फे साक्षीदार क्र.६**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | दगडु महादु शेळके |
| वय | – | ७९ वर्षे, |
| व्यवसाय | – | काही नाही. |
| राहणार | – | टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३, २० व २२ तर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

३. मला दोन पत्नी आहेत. मौजाबाई आणि हिराबाई ही माझ्या पत्नीचे नावे आहेत. मौजाबाईला विष्णु व संजु ही दोन मुले आहेत. हिराबाई हिला दादा हा मुलगा आहे. हे खरे आहे की, मुलगा विष्णु, संजु, दादा व माझ्यात पुर्वी कर्जत न्यायालयात दावे चालु होते. हे खरे आहे की, त्यामुळे कर्जत न्यायालयात माझे नेहमी जाणे–येणे होते. राजारामला चौघे भाऊ आहेत. तुकाराम, सखाराम, राजाराम ही त्यांची नावे आहेत. चौथ्या भावाचे नाव मला सांगता येत नाही. बाभुळगाव येथे राजाराम व त्याच्या भावाला किती क्षेत्र जमिन आहे हे मला सांगता येत नाही. राजाराम यांचे बाभुळगाव येथील जमिनीचे वाटप झालेले आहे. सदर वाटपासाठी मी हजर नव्हतो. हे खरे आहे की, सदर वाटपाबद्दलची प्रत्यक्ष माहिती मला नाही. दावा मी वाचलेला नाही व पाहिलेला नाही. दाव्यामध्ये दावा मिळकती कोणत्या आहेत, त्यांचे गट काय आहेत हे मला सांगता येत नाही. हे खरे आहे की, दावा मिळकतीबद्दल मला काही सांगता येत नाही. हे खरे नाही की, दाव्यात वादी किती व प्रतिवादी किती व कोण आहेत हे मला सांगता येणार नाही. वादी विठ्ठल व मैनाबाई आहेत. हे खरे नाही की, विठ्ठलने मला कशी साक्ष द्यायची हे सांगितले. दावा मिळकती खरेदी घेत असताना मी त्या व्यवहाराला हजर नव्हतो. त्या मिळकती किती रकमेला व कोणत्या गटातील जमिन विकत घेतली हे मला सांगता येत

नाही. त्या जमिनी ३०–४० वर्षांपुर्वी घेतलेल्या आहेत. मैनाबाई राजारामची पत्नी आहे. हे खरे आहे की, मैनाबाई व राजाराम यांची कोर्टात केस चालु होती. हे खरे आहे की, न्यायालयात केस चालु असल्यामुळे ते वेगवेगळे राहत होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, ते आजही वेगवेगळे राहतात. राजारामला २ मुले आहेत, त्यांची नावे दत्तु व विठ्ठल आहे. दत्तु हा थोराला मुलगा आहे. त्याला किती मुले आहेत हे मला सांगता येत नाही. दत्तुला पत्नी आहे, तिचे नाव मला सांगता येत नाही. दत्तु याची पत्नी व मुलाला मी ओळखत नाही. हे खरे आहे की, मैनाबाई, दत्तु व राजाराम यांचे पटत नसल्यामुळे ते वेगळे राहत होते. हे खरे आहे की, मैनाबाई आणि दत्तु, राजाराम हे २५–३० वर्षांपासुन वेगवेगळे राहतात. हे खरे आहे की, विठ्ठल व मैनाबाई हे बाभुळगाव–मिरजगाव रोडवर पश्चिम बाजुला राहतात. हे खरे आहे की, दत्तु हा बाभुळगावात राहतो. दत्तु याला मी जन्मापासुन ओळखतो. दत्तुचे शिक्षण काय झाले मला सांगता येत नाही.

४. हे खरे आहे की, दत्तु हा वेल्डींगचा व्यवसाय करतो. हे खरे आहे की, कर्जत येथे बेद्रे यांच्याकडे दत्तात्रय मजुरीने कामाला होता. हे खरे आहे की, त्यानंतर माहिजळगाव येथे दत्तात्रयने भाड्याच्या जागेत स्वतःचा व्यवसाय टाकला. हे खरे आहे की, २५ वर्षांपासुन दत्तात्रय लबडे हा वेल्डींगचा व्यवसाय करतो. हे खरे आहे की, त्याचा व्यवसाय चांगला चालतो. हे खरे आहे की, वादी विठ्ठलने काही कष्ट केले नाही. हे खरे नाही की, दत्तुने वेल्डींगच्या पैशातुन जमिनी विकत घेतल्या. दत्तुने घेतलेल्या जमिनीसाठी विठ्ठलने पैसे दिलेले नाहीत. हे खरे आहे की, दत्तुने विकत घेतलेल्या जमिनीमध्ये जमिनीचे सपाटीकरण, माती भरणे, बोअर, विहीर केलेली आहे. हे खरे आहे की, दत्तुने जमिनीचा पोत सुधरवलेला आहे. हे खरे आहे की, दत्तु चांगली पीके घेतो. राजाराम लबडे याचा सासरा महादु वडवकर याला दोन बायका आहेत. त्यापैकी एका पत्नीचे नाव नर्मदा होते व दुसऱ्या पत्नीचे नाव मला माहिती नाही. नर्मदाला दोन ते चार मुली होत्या व एक मुलगा होता. हे खरे आहे की, नर्मदाचा एक मुलगा मयत झालेला आहे. हे खरे नाही की, वादी क्र. २ मैनाबाई लबडे हिचे तिच्या वडीलांसोबत जमले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, काही काळ त्यांचे जमले व काही काळ जमले नाही. मैनाबाईचे तिच्या वडीलांसोबत तीस एक वर्षे जमले. त्यांचे कोणत्या वर्षापासुन कोणत्या

वर्षापर्यंत जमले हे मला सांगता येत नाही. मला दावा मिळकतीच्या चतुःसिमा सांगता येणार नाहीत. दावा मिळकत मी रोडवरुन पाहिलेली आहे. साक्षीला येण्यापुर्वी विठ्ठलने माझी भेट घेतली. वादी विठ्ठल याने वाद मिळकतीबद्दल साक्षीकामी मला बोलवले होते. प्रतिवादी क्र. १ व २ हे राजाराम किंवा दत्तात्रय आहेत. प्रतिवादी क्र. १ व वादी क्र. २ यांचे जमत नव्हते असे मी शपथपत्रात नमुद केले आहे म्हणजे विठ्ठल व दत्तु यांचे जमत नव्हते असे मला म्हणायचे आहे. त्यांचे २५-३० वर्षांपासुन जमत नाही. हे खरे आहे की, शपथपत्रातील मजकुर विठ्ठलने सांगितला व वकीलांनी तयार केला व त्यानंतर मी सही केली. हे खरे आहे की, तयार केलेल्या शपथपत्रानुसार मी कोर्टात साक्ष देत आहे. हे खरे आहे की, मी आज विठ्ठलसोबत आलेलो आहे. हे खरे नाही की, मी खोट्या मजकुराचे खोटे शपथपत्र तयार करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ यांच्यामार्फत –**

**प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ पुकारले असता गैरहजर. करिता त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.30 18:00:02 +0530

(आर. बी. राऊत)

दि.३०/३/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर